## फास्ट न्यूज

### तिघांची तरुणाला मारहाण

घाटकोपरच्या रमाबाईनगर आंबेडकर नगर परिसरातील पंचशील मित्रमंडळ येथे सायकलने कट मारण्यावरून झालेल्या वादातून तीन तरुणांनी अजित नावाच्या तरुणाला गंभीर मारहाण केली. या प्रकरणी जतीन सिंह, आकाश सिंह आणि सुमित सिंह यांना पंतनगर पोलिसांनी अटक केली आहे. या तिघांनी अजितला जातीवाचक शिवीगाळ केल्याने त्या परिसरातील नागरिकांच्या धार्मिक भावना दुखवल्याचेही पोलिस तक्रारीत म्हटले आहे.

### एकांकिका स्पर्धोत्सव



प्रयोग मालाडतर्फे गाजलेल्या एकांकिका नव्या रंगकर्मींना अभ्यासता याव्यात यासाठी लेखक एक नाट्यछटा अनेक या संकल्पनेअंतर्गत एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हे यंदाचे चौथे वर्ष असून यंदा लेखक प्रदीप राणे यांच्या एकांकिका सादर करायच्या आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख ६ ऑगस्ट आहे. अधिक माहितीसाठी - ९८६९६२७९५०, ९९२०७५९६५९. वेबसाइट - www.prayogmalad.org

### बासरीवादन

इंडियन काऊन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स आणि नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट (एनजीएमए) यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, २१ जुलैला सायं. ६.३० वाजता सुदीप चट्टोपाध्याय यांच्या बासरीवादनाचा कार्यक्रम होणार आहे. एनजीएमएच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात, काळा घोडा येथे हा कार्यक्रम होईल.

गणपतीसाठी २५० गाड्यांच्या नियोजनाचा रेल्वेपुढे प्रश्न

# वेळेत पोहोचणार का?

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

**गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी रेल्वेतर्फे यंदाच्या वर्षी २५० फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, त्यामुळे गणेशोत्सवाच्या कालावधीत या सर्व फेऱ्यांचे वेळापत्रक सांभाळण्याची मोठी कसरत मध्य, पश्चिम आणि प्रामुख्याने कोकण रेल्वेस करावी लागणार आहे. पावसाळ्यात गाड्यांचा वेग मंदावत असल्याने नियमित आणि जादा गाड्या वेळेत सुटणे आणि त्या वेळेत पोहोचण्याचे अग्निदिव्य साधावे लागणार आहे.**

रेल्वेतर्फे गौरी-गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्यांसाठी नियमित आणि जादा गाड्या सोडल्या जातात. मध्य रेल्वेची हद्द संपणाऱ्या रोह्यापासून ते ठोकूरपर्यंत कोकण रेल्वेचा मार्ग येतो. हा संपूर्ण मार्ग एकेरी असल्याने गाड्यांचे वेळापत्रक राखणे अवघड आव्हान असते. त्यातच कोकण मार्गावरील गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी कायम सुरू असते. गणेशोत्सवात ही मागणी आणखीनच वेगाने सुरू असते. एकेरी मार्गामुळे गाड्या वाढविणे, फेऱ्या चालविणाऱ्यावर मर्यादा येत असतात.

यंदा मध्य रेल्वेने गणेशोत्सवासाठी २०२, पश्चिम रेल्वेने वांद्रे, मुंबई टर्मिनस, अहमदाबादहून ३८ फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेतल्याने या मार्गावरील फेऱ्यांची संख्या २४० वर पोहोचली आहे. त्यातच नियमित गाड्यांच्या फेऱ्यांचा अंदाज मांडल्यास या एकेरी मार्गावरून मर्यादित कालावधीसाठी जाणाऱ्या फेऱ्यांचा मोठा ताण सेवेवर पडण्याची शक्यता आहे.

हा संपूर्ण मार्ग एकेरी असल्याने ताण पडत असल्याचे सांगण्यात येत आहे. कोकण मार्गावरील दुपरीकरणाचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून पनवेल ते रोहा मार्गात पनवेल-कासू ते नागोठणेपर्यंत दुपदरीकरणाचे काम पूर्णत्वास आले आहे. त्यापुढे ठोकूरपर्यंत दुपरीकरण प्रकल्पाचे उद्घाटन झाले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर गाड्या आणि फेऱ्यांमध्ये वाढ करणे शक्य होणार असल्याचे सांगितले.



### जादा गाड्यांचे आरक्षण आजपासून

मध्य रेल्वेने सीएसएमटी, एलटीटी, पनवेल, पुणे येथून सोडलेल्या गणपती विशेष गाड्यांचे आरक्षण आज, मंगळवार जुलैपासून सुरू होणार आहे. यात गाडी क्र. ०१४३७, ०११८९, ०११९१, ०१०४३, ०१०४५ यांचा समावेश आहे.

### पावसाळ्यात अडचणींचा डोंगर

कोकण रेल्वेवर पावसाळ्यात गाड्यांचा वेग कमी ठेवण्यात येतो. कोरे मार्गावर दरडी कोसळून वाहतूक खोळंबू नये म्हणून विविध उपाय योजण्यात येतात. अशातच पावसाचा जोर वाढल्यास वाहतुकीवर परिणाम होउन नियोजन कोलमडत असल्याचा अनुभव येतो. त्यामुळे पावसाळ्यात जादा गाड्यांचे वेळापत्रक सांभाळणे आव्हानाचे असल्याचे मत वरिष्ठ अधिकारी व्यक्त करतात.

**कोकण मार्गावर धावणाऱ्या फेऱ्या**

| | |
|---|---|
| मध्य रेल्वेच्या विशेष फेऱ्या : | २०२ |
| पश्चिम रेल्वेच्या विशेष फेऱ्या : | ३८ |
| नियमित व इतर फेऱ्या : | १० |
| एकूण फेऱ्यांची संख्या : | २५० |



# एसटीचे अर्थसहाय्य!

hemant.satam
@timesgroup.com
Tweet : @hemantsatamMT

**मुंबई :** अपघातानंतरचे आयुर्विम्याचे महत्त्व लक्षात घेत एसटी महामंडळाने प्रवाशांसाठी राबविलेल्या अपघात सहाय्यता निधी योजनेने एसटी अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना व जखमींना चांगलाच आधार दिला आहे. प्रवासी तिकिटावर एक रुपया अधिभार आकारून सुरू करण्यात आलेल्या या योजनेतून आतापर्यंत ७४ कोटींचा निधी देण्यात आला आहे. विशेष म्हणजे ही योजना खासगी कंपनी मदतीशिवाय महामंडळातर्फेच चालवण्यात येत आहे.

खासगी बसवाहतुकीच्या तुलनेत एसटी महामंडळाच्या बस अपघातांचे प्रमाण कमी आहे. एप्रिल २०१६ ते लाख किमी अंतरामागे अपघाताचे प्रमाण ०.१३ नोंदवण्यात आले. साधारण दीड वर्षापर्यंत एसटी बसअपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना आणि जखमींना देण्यात येणारी आर्थिक मदत महामंडळातर्फे करण्यात येत होती. पण त्यानंतर तिकिटावरील अधिभाराच्या रूपाने निधी गोळा करून त्यातून अपघात सहाय्यता निधीतून आर्थिक सहाय्य करण्याची योजना राबवण्यात आली. १ एप्रिल २०१६ पासून लागू करण्यात आलेल्या योजनेत एसटी अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना १० लाख, तर गंभीर अपंगत्व आलेल्यांना पाच लाखांपर्यंत सहाय्य केले जाते.

### अपघात सहाय्यता निधी योजनेतून अपघातग्रस्तांना ७४ कोटी



**प्रवासी, कर्मचाऱ्यांना मदत**

एप्रिल २०१५ ते मे २०१६ कालावधीत अपघातातील मृतांची संख्या सुमारे ६०, तर एप्रिल २०१६ ते मे २०१७ पर्यंत मृतांची संख्या सुमारे ५० नोंदविण्यात आली. त्यातील मृत आणि गंभीर, किरकोळ जखमी प्रवाशांप्रमाणेच कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे ८०० आणि ७६० इतकी आहे. या सर्वांना अपघात सहाय्यता निधी योजनेतून मदत करण्यात येते.

**मटा विशेष**

ही योजना अंमलात येईपर्यंत दरवर्षी सुमारे ५० कोटी महामंडळ देत असे. परंतु तिकिटावरील अधिभारामुळे आर्थिक सहाय्यता रक्कमेसाठी स्वतंत्र निधीची तरतूद झाली आहे. या निधीत गोळा होणाऱ्या रकमेतील शिल्लक रकमेतून रस्ते अपघात कमी होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

ही योजना लागू करण्यापूर्वी मृतांच्या कुटुंबीयांना तीन लाखांच सहाय्य केले जात होते. १ एप्रिल २०१६ पासून त्यात १० लाखांपर्यंत वाढ करण्यात आली. आघाडी सरकारच्या कार्यकाळात एसटीचे तत्कालीन अध्यक्ष जीवनराव गोरे यांनी अपघात सहाय्यता निधी योजना मांडली. त्यावेळी खासगी विमा कंपनीच्या सहाय्याने ही योजना राबविण्याचा प्रस्ताव होता. त्यास पुढे गती न मिळाल्याने ही फाइल महामंडळाकडे पडून होती. परिवहनमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांनी ही धूळ खात पडलेली योजना आखताना त्यात खासगीऐवजी एसटीतर्फे विमा रक्कम देण्यावर भर दिल्यानंतर ही योजना अमलात आली.

# ‘एनआयई’तर्फे सहलीच्या माध्यमातून शिक्षण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

लोणावळ्याच्या टाटा पॉवर महाशीर हॅचरीमध्ये महाशीर या दुर्मिळ माशाचे संवर्धन करण्याचा प्रयत्न होत आहे. या माशाबद्दल नागरिकांना माहिती व्हावी, यासाठी ‘टाइम्स न्यूजपेपर इन एज्युकेशन’ (एनआयई) आणि टाटा पॉवरच्या वतीने नुकतेच शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी धमाल-मस्ती करत ज्ञान मिळवले.

जमिनीचा वापर, नद्यांचा पात्रबदल, पाण्याच्या पातळीत झालेला बदल, शेतीमध्ये वाढलेले कीटकनाशकांचे प्रमाण, नदीपात्रात होणारे प्रदूषण यामुळे या माशांवर विपरित परिणाम झाला आहे, अशी माहिती टाटा पॉवरच्या जैवविविधता विभागाचे प्रमुख विवेक विश्वासराव यांनी दिली. हा मासा गोड्या पाण्यात आढळतो. प्रामुख्याने पुणे-लोणावळा पट्ट्यात मुळा-मुठा नद्या, इंद्रायणीच्या पात्रात हा मासा आढळतो. १९७०मध्ये महाशीर संवर्धन प्रकल्पाला सुरुवात झाली. अंडी उबवून दरवर्षी चार ते पाच लाख माशांची पैदास केली जाते. देशभरात हा मासा कुठे आहे, याची माहिती ठेवली जाते. टाटा पॉवर या माशांच्या पिल्लांना संबंधित राज्याच्या मत्स्य विभागातर्फे त्या राज्यात पाठवते, अशीही माहिती विश्वासराव यांनी दिली.



मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरातील शाळांमधील काही विद्यार्थ्यांनी पर्यावरण संतुलनासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबाबत चर्चा केली. महाशीर माशानेसुद्धा आजूबाजूच्या पर्यावरणाशी जुळवून घेत प्रतिकूल परिस्थितीवर मात केली आहे. त्यामुळे या माशाचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. महाशीर संवर्धन कार्यक्रमातून हा मासा पूर्वीसारखाच सर्व ठिकाणी उपलब्ध होईल, असा विश्वास महाशीर संवर्धन केंद्राच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

या ज्ञानवर्धक अनुभवानंतर स्नेहील सारंही या दहावीच्या विद्यार्थिनीने ही शैक्षणिक सहल डोळ्यात अंजन घालणारी ठरल्याची प्रतिक्रिया दिली. तिने ‘एनआयई’चे आभार मानले. या उपक्रमाचे शिक्षकांनीसुद्धा भरभरून कौतुक केले.

# एसटी वेतनवाढीचा तिढा सुटणार!

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचा नवीन वेतन करार सव्वा वर्षापासून प्रलंबित असताना त्यातून मार्ग काढण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. १६ महिन्यांपासून नवीन वेतनवाढीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. त्यासाठी १९ जुलैपासून राज्यातील सर्व विभागांतील एसटी कामगारांशी संवाद साधला जाणार आहे.

एसटीतील कर्मचाऱ्यांचा २०१२ ते २०१६चा वेतनकरार संपुष्टात आला असून, नवीन करार अजून लागू झालेला नाही. त्यात मान्यताप्राप्त महाराष्ट्र कामगार संघटनेने सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीची मागणी केली आहे. अशा स्थितीत हा तिढा सोडवण्यासाठी महामंडळाने कामगारांशी थेट संवाद साधण्याचा निर्णय घेतला आहे.

एसटी महामंडळ आणि मान्यताप्राप्त कामगार संघटनेकडून चार वर्षांसाठी कामगार करार केला जातो. २००८ आणि २०१२ या कालावधीत एसटी कामगारांना १७.५ टक्के, त्यापुढील कालावधीत १३ टक्के वाढ मिळाली होती. २०१६मध्ये करार संपल्यानंतर नवीन करार होणे अपेक्षित होते; परंतु सातव्या वेतन आयोगातील तरतुदींप्रमाणे अन्य मागण्यांसाठी मान्यताप्राप्त संघटनेकडून मागणी सुरू आहे. सातव्या वेतन आयोगाप्रमाणे आर्थिक तरतुदी दिल्यास महामंडळ चालवणेही कठीण होईल, अशी महामंडळाची भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर कामगारांच्या दृष्टीने नवीन वेतन करार होणे आवश्यक असल्याने एसटीने कामगारांशी संवाद साधण्याचे ठरविले आहे.

महामंडळाच्या परिपत्रकात ३० एप्रिलपर्यंत करार कार्यान्वित करण्याची भूमिका घेण्यात आली आहे. पण त्यात संघटनेकडून कोणताही प्रस्ताव नसल्याने महामंडळासमोरही अडचण निर्माण झाली आहे. महामंडळाची वेतनकराराबाबत



**कामगारांबरोबर संवादाचा प्रशासनाचा निर्णय**

सकारात्मक भूमिका असूनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याने परिवहनमंत्री आणि एसटीचे अध्यक्ष दिवाकर रावते यांनी थेट कामगारांशी चर्चा करण्याचे आदेश दिले आहेत. त्यासंदर्भात आगारात होणाऱ्या बैठका योग्यप्रकारे पार पाडल्या जाव्यात, अशीही सूचना करण्यात आली आहे.

वेतनकरार न झाल्याने कामगारांचे नुकसान होत आहे. त्यास मान्यताप्राप्त कामगार संघटनेचा दोष असून कामगारांनी स्वत:चे हित ओळखले पाहिजे, अशी भूमिका महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी मांडली आहे. या पार्श्वभूमीवर महामंडळाने वेतन कराराबाबत मान्यताप्राप्त युनियनशी चर्चा करणे आवश्यक असल्याची भूमिका महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे सरचिटणीस हनुमंत ताटे यांनी मांडली आहे. वेतनकराराबाबत कामगारांचे मत मतदानातून जाणून घेतले होते, त्यात कामगारांनी सातव्या वेतन आयोगाबाबत अनुकूलता दर्शवल्याचे म्हटले आहे.

## अकरावीची दुसरी यादी २० जुलैला

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

अकरावी प्रवेशासाठी आता सर्वांचे लक्ष दुसऱ्या यादीकडून लागले असून, दुसऱ्या फेरीसाठी उद्या, मंगळवार अखेरचा दिवस राहणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना दुसऱ्या यादीसाठी पसंतीक्रम भरण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. २० जुलैला दुसरी यादी जाहीर होणार आहे.

अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेसाठी यंदा दोन लाख २६ हजार १४३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी पहिल्या यादीत तब्बल एक लाख ५६ हजार ५०७ विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश जाहीर करण्यात आले होते, तर इनहाऊस, अल्पसंख्याक, व्यवस्थापन अशा विविध कोट्यांतून ३२ हजार ४७७ विद्यार्थ्यांचे प्रवेशही या यादीत निश्चित करण्यात आले होते. ऑनलाइन प्रवेशांपैकी एकूण ७५ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असून, पहिल्या यादीतील निम्म्याहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश नाकारत दुसऱ्या यादीत नशीब अजमाविण्याची तयारी सुरू केली आहे. त्यानुसार या विद्यार्थ्यांना १५ जुलैपासून प्रवेशाची संधी देण्यात आली होती.

मंगळवारी ५ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज तसेच कॉलेजांचे पसंतीक्रम विद्यार्थ्यांना बदलता येतील. अकरावीला पहिल्या यादीत प्रवेश मिळूनही प्रवेश न घेतल्यामुळे दुसऱ्या फेरीसाठी तब्बल एक लाख १९ हजार ९६५ जागा उपलब्ध आहेत.

# वेलिंगकरमध्ये कृषी व्यवस्थापन अभ्यासक्रम

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

देशभरातील तरुण पिढीला कृषी आणि ग्रामीण व्यवस्थापन क्षेत्राकडे वळवण्यासाठी आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उपक्रमातून आधुनिक शेतीतंत्राकडे लक्ष वेधून घेण्यासाठी मुंबईतील वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च पुढे सरसावले आहे. वेलिंगकर इन्स्टिट्यूट, नेदरलँड्सची व्हीएचएल युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्सेस तसेच बारामतीस्थित ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्यात सोमवारी विशेष करार करण्यात आला. याअंतर्गत लवकरच या विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.



**नेदरलँड्समधील विद्यापीठासह ॲग्रीकल्चर डेव्ह. ट्रस्टशी करार**

शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार आणि व्हीएचएल युनिव्हर्सिटीच्या डेल्टा एरियाज ॲण्ड रिसोर्सेसचे संचालक डॉ. हॅरी ऑन्कॉन यांनी या त्रिपक्षीय इरादापत्रावर सोमवारी स्वाक्षरी केली. यावेळी ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे सीईओ नीलेश नलावडे, व्हीएचएल युनिव्हर्सिटीच्या प्रा. मरीस, श्रीतनु चॅटर्जी, शि.प्र.मंडळीचे विश्वस्त उपस्थित होते.

या उपक्रमातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील कृषीविषयक उद्योग-व्यवसायाचे व्यावहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल, असा विश्वास ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी व्यक्त केला. एसपी मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन म्हणाले, ‘विद्यार्थ्यांना या प्रकल्पातून शिक्षण-प्रशिक्षण व संशोधनाच्या संधी मिळतील. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संबंधही दृढ होतील, कृषीक्षेत्रात वेगाने विकसित होत असलेल्या स्टार्ट-अप संस्कृतीलाही नवी ऊर्जा मिळेल.’ ‘एडीटी आणि व्हीएचएल विद्यापीठातील शिक्षण आणि प्रत्यक्ष कार्यानुभवातून आपल्या विद्यार्थ्यांना कृषी, ग्रामीण भागाच्या समस्या, तिथे आपल्या व्यवसायाची व्याप्ती वाढवू पाहणारे राष्ट्रीय-बहुराष्ट्रीय उद्योग, आधुनिक तंत्रज्ञान, कृषीव्यवसाय, कृषीउत्पादन, अन्नप्रक्रिया, पुरवठासाखळ्या, आर्थिक व्यवहार यांना परिचय होऊन ते अधिक सक्षम होतील. यातून त्यांच्यासाठी करिअरचे नवे मार्ग खुले होतील,’ असे वीस्कूलचे समूह संचालक प्रा. डॉ. उदय साळुंखे म्हणाले.

## जिवंत काडतूस बाळगणाऱ्यास अटक

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

विमानप्रवासादरम्यान जिवंत काडतूस बाळगणाऱ्यास सहार पोलिसांनी रविवारी अटक केली. कमलाकांत कारला असे त्याचे नाव आहे. भारतीय हत्यार कायदा आणि विनापरवाना काडतूस बाळगल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा नोंदवल्याचे सहार पोलिसांनी सांगितले.

मूळचा गुजरातच्या वृंदावननगर, २ बामरोली रोड गोध्रा येथील रहिवासी असलेला कारला मुंबई ते अहमदाबाद प्रवास करत होता. सुरक्षा दरवाजातून जाताना तपासणीवेळी त्याच्या सामानात हे काडतूस सापडले. त्यानंतर कस्टम अधिकाऱ्यांनी कारलाला सहार पोलिसांच्या ताब्यात दिले.

# कदमांच्या आरोपांची चौकशी पूर्ण

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील गैरव्यवहारांप्रकरणी अटकेत असलेले आमदार रमेश कदम यांनी पोलिसांवरच केलेल्या आरोपांविषयीची चौकशी नागपाडा पोलिसांनी पूर्ण केली असून त्याचा अहवाल पोलिस आयुक्तांना दिला आहे. सरकारी वकील मानकुंवर देशमुख यांनी सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात ही माहिती दिली. त्यानंतर न्यायालयाने यासंदर्भात एफआयआर करायचा की नाही, याविषयीचा निर्णय घेण्यासाठी आयुक्तांना दोन आठवड्यांची मुदत दिली.

मे महिन्यात एके दिवशी कदम यांना जे. जे. रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात येत असताना भायखळा तुरुंगाच्या बाहेर त्यांनी सहायक पोलिस निरीक्षक मनोज पवार यांना शिवीगाळ केली आणि धमकावले, असा आरोप आहे. पवार यांनी या साऱ्या प्रकाराचे सहकारी पोलिस कॉन्स्टेबलच्या सहकार्याने मोबाइलमध्ये रेकॉर्डिंगही करून घेतले होते. त्यामुळे त्याआधारे नागपाडा पोलिसांनी गुन्हा नोंदवून त्या प्रकरणात कदम यांना अटक केली होती. मात्र, ‘पवार यांनीच आधी मला जातीवाचक शिवीगाळ केली आणि माझ्याकडे २५ हजार रुपयांची लाच मागितली’, असे आरोप कदम यांनी केले आहेत. तसेच याप्रकरणी नागपाडा पोलिस हे पोलिसांविरुद्ध एफआयआर नोंदवून घेत नसल्याने त्यांनी ॲड. सचिन पवार यांच्यामार्फत उच्च न्यायालयात रिट याचिका केली आहे. याविषयी न्या. रणजीत मोरे व न्या. सारंग कोतवाल यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. तेव्हा, ‘पोलिसांच्या सांगण्यावरून त्वरित एफआयआर झाला, मात्र आमच्या आरोपांविषयी कित्येक दिवस होऊनही एफआयआर नोंदवला जात नाही’, असे म्हणणे पवार यांनी मांडले. मात्र, या आरोपांबाबत नागपाडा पोलिसांनी चौकशी पूर्ण करून अहवाल पोलिस आयुक्तांकडे दिला असून ते योग्य ते निर्णय घेतील, त्यामुळे थोडा अवधी द्यावा, असे सरकारी वकील देशमुख यांनी सांगितले. त्यानुसार, खंडपीठाने दोन आठवडे दिले.

### ‘नाजुका’ तृप्ती भोईर लग्नाच्या बेडीत



**सर्वाधिक शेअर झालेली बातमी**

**‘अगडबम’ चित्रपटातील ‘नाजुका’, अर्थात अभिनेत्री तृप्ती भोईर दाक्षिणात्य संगीतकार टी. सतीश चक्रवर्तीसोबत विवाहबंधनात अडकली आहे. चेन्नईत हा सोहळा पार पडला.**

# नदी बचावासाठी बळ

## सर्वोच्च न्यायालयाने उठवली दंडावरील स्थगिती

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

उल्हास नदी प्रदूषण प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर या महापालिका-नगर परिषदांना राष्ट्रीय हरित लवादाने ठोठावलेला ९६ कोटींचा भरभक्कम दंड भरावा लागण्याची चिन्हे आहेत. दंड आकारण्याच्या लवादाच्या आदेशाला उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने उठवली आहे. पुढील तीन आठवड्यांत याप्रकरणी लवादाकडे पुनर्विचार याचिका दाखल करा किंवा आमच्याकडे म्हणणे मांडा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयाने नदी बचाव उपक्रमासाठी झटणाऱ्या संस्था आणि कार्यकर्त्यांना बळ मिळाले आहे.

दोन्हीपैकी एका पर्यायाची निवड करण्यासाठी न्यायालयाने यंत्रणांना तीन आठवड्यांची मुदत दिली आहे. या निर्णयामुळे प्रदूषणाच्या मुद्यावर पळवाट शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या या महापालिकांना आता ठोस आराखडा सादर करावा लागणार आहे.

काठावरील कारखान्यांमुळे उल्हास नदी प्रचंड प्रदूषित झाल्याचा मुद्दा उचलत ‘वनशक्ती’ या पर्यावरणवादी संस्थेने २०१५ साली हरित लवादाकडे याचिका दाखल केली होती. नदीच्या काठावरील कारखाने कोणत्याही स्वरूपाची प्रक्रिया न करता नदीत घातक द्रव्ये सोडत असून त्यांना प्रतिबंध करण्यात उल्हानगर महापालिका, अंबरनाथ महापालिका, कल्याण-डोंबिवली महापालिका, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ पूर्णपणे अपयशी ठरल्याचा दावा संस्थेने केला होता. याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळही कोणती कारवाई करत नाही, याकडेही लक्ष वेधण्यात आले होते. या याचिकेची दखल घेऊन लवादाने पाहणी केली होती. त्यानंतर संबंधित यंत्रणांना प्रतिबंधक उपाय योजण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यानंतरही प्रदूषण रोखण्याबाबत या यंत्रणांनी ठोस पावले उचलली नव्हती. त्यामुळे लवादाने या सर्वांना मिळून ९६ कोटींचा जबर दंड ठोठावला होता. त्यानंतर या यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या. उपाययोजना करू, अवधी द्या, असे या यंत्रणांनी सांगितले खरे, पण त्यानंतरही त्यादृष्टीने काम केले नाही. उलट लवादाच्या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर न्यायालयाने लवादाच्या आदेशाला स्थगिती दिली होती. दोन वर्षे झाली तरी स्थगिती कायम राहिल्याने वनशक्तीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. लवादाच्या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देता येत नाही. लवादाच्या आदेशाला कोणाचा आक्षेप असेल, तर पुन्हा लवादाकडे पुनर्विचार याचिका करावी लागते, किंवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते, असे वनशक्तीचे म्हणणे आहे.

### ... तर दंड भरावा लागणार!

संस्थेच्या याचिकेची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने नवा आदेश काढला आहे. त्यानुसार संबंधित यंत्रणांनी एकतर पुन्हा लवादाकडे फेरविचार याचिका करावी किंवा आमच्याकडे यावे, असे या आदेशात म्हटले आहे. या मुदतीत कोणताही पर्याय न निवडल्यास या यंत्रणांना दंड भरावा लागण्याची शक्यता आहे.



# सीमा अधोरेखित करा!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अधिकाऱ्यांना आदेश

**मुख्यमंत्र्यांच्या या आदेशानंतर पोयसर नदीवर ही नाला नसून नदी आहे, अशा पद्धतीचे आणखी फलक लावण्यात येणार आहेत. या आधीही काही ठिकाणी असे फलक लावले आहेत. त्या ठिकाणी कचरा फेकल्यास दंड ठोठावण्याची तजवीज केली आहे. तिथे क्लीनअप मार्शल्सही तैनात आहेत. काही ठिकाणी नदीची माहिती देणारे फलक पडले आहेत. ते पुन्हा लावण्यात येतील.**

**- साहेबराव गायकवाड,** सहाय्यक आयुक्त-आर दक्षिण विभाग

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील नद्यांची श्रीमंती या प्रवाहात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे नाहिशी झाली आहे. नद्यांच्या प्रवाहामध्ये उपनद्यांमधून प्रदूषके, कचरा, सांडपाणी मिसळले जात आहे. त्यामुळे या उपनद्या आणि नद्यांची सीमा सूचित झाल्यास त्यांना मिळणारी गटाराची वागणूक कायदेशीरदृष्ट्या सुधारण्यासाठी मदत होईल. रिव्हरमार्च आणि नद्यांसाठी लढणाऱ्या मुंबईकरांसोबत झालेल्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नद्या आणि उपनद्या सूचित करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

नद्या आणि उपनद्यांची सीमानिश्चिती झाल्यास पूर्वीच्या नकाशात दाखवण्यात आलेल्या नद्या-उपनद्या आणि आत्ताची किनाऱ्यांची स्थिती यावरून नेमके कुठे अतिक्रमण झाले आहे, हे निश्चित होईल. काही ठिकाणी नद्यांचे वळलेले प्रवाह भिंत घालून अडवून वळणावर भराव घालण्यात आला आहे. या ठिकाणी अतिक्रमणे निर्माण झाली आहेत. नद्यांची सीमानिश्चिती केल्यावर या गोष्टी समोर येऊन अतिक्रमणे हटवण्याच्या कारवाईला चालना मिळू शकते, अशी माहिती महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचे उपसंचालक अविनाश कुबल यांनी दिली.

आतापर्यंत उपनद्यांनाही नाले म्हटले जात होते. डासांची उत्पत्ती, डम्पिंग ग्राऊंड असे यांचे स्वरूप झाले होते. मात्र उपनद्या कुठे आहेत हे समोर आल्यास आता कायदेशीर या प्रवाहांचे संवर्धन होण्यासाठी मदत होऊ शकेल, असे वॉटर एन्व्हायरोन्स या संस्थेचे आर्किटेक्ट विक्रम पवार यांनी स्पष्ट केले. कायदेशीरदृष्ट्या नाल्यांना उपनद्या असे नाव मिळाल्यास पर्यावरणीयदृष्ट्या फायदा होईल. नाले असा शब्द वापरला जातो तेव्हा त्या प्रवाहाकडे सांडपाण्याचा मार्ग म्हणून पाहिले जाते. हा दृष्टिकोन कायद्यामुळे बदलेल. ओशिवरा नदीला पूर्वेकडे वालभट नाला आणि पश्चिमेकडे ओशिवरा नाला असे संबोधले जाते. पोयसरलाही नाला असे अनेक ठिकाणी म्हटले जाते. सीमानिश्चितीमुळे हे प्रवाह नाले नसून नद्या असल्याची माहिती सामान्यांपर्यंत पोहोचेल.

उपनद्यांमध्ये थेट सोडले जाणारे सांडपाणी हे प्रदूषणास महत्त्वाचे कारण आहे. त्यावर प्रक्रिया केली जाईल, त्यासाठी किनाऱ्यावर ठिकठिकाणी सांडपाणी पुन:प्रक्रिया केंद्र निर्माण करण्यात येतील. नद्यांच्या सीमानिश्चितीसोबतच वर्षावर झालेल्या बैठकीमध्ये नद्यांसाठी महापालिकेमध्ये स्वतंत्र विभाग निर्माण करण्याची मागणी करण्यात आली आहे. नद्यांचे प्रश्न पर्जन्यजल वाहिन्यांच्या विषयात सामावले जातात. मात्र हा प्रश्न स्वतंत्र पद्धतीने हाताळावा, असेही सुचवण्यात आले.